www.dainikmahabharat.com ● RNI No. MAHMAR/2015/64418 ● jaymahabharat2015@gmail.com



दैनिक
# महाभारत
संपादक - विजयकुमार वाव्हळ

मुंबई: यंदाच्या वर्षी मान्सूनने अपेक्षेपेक्षा आधीच देशात आणि राज्यात प्रवेश करत दमदार सुरुवात केली होती. जून महिन्याच्या मध्यावर काहीसा खंड पडल्यानंतर जुलैमध्ये पावसाने पुन्हा जोर धरला. मात्र, जुलैच्या अखेरीस राज्याच्या अनेक भागांमध्ये पावसाचा जोर कमी झाला होता. पण आता ऑगस्ट महिन्यात पुन्हा पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे, असा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे.

महाराष्ट्र ● बीड (महाराष्ट्र) ● दैनिक ● मराठी ● वर्ष - १० ● अंक ३४१ ● शनिवार दि.०२ ऑगस्ट २०२५ ● किंमत २ रू. ● पाने ६

छत्रपती संभाजीनगर, नागपुर, नाशिक, मुंबई, रायगड, पुणे, कोल्हापुर, अहिल्यानगर, अमरावती, ठाणे, सोलापूर, नांदेड, लातुर, धुळे, जालना, धाराशिव, मुंबई, हिंगोली, परभणी, जळगांव, वर्धा, सातारा येथुन प्रकाशित होणारे मराठवाड्यातील एकमेव दैनिक

काशी के मेरे परिवारजनों के लिए कल २ अगस्त का दिन बहुत विशेष है। सुबह करीब ११ बजे शिक्षा, स्वास्थ्य, स्पोर्ट्स, टूरिज्म और कनेक्टिविटी से जुड़े कई प्रोजेक्ट का उद्घाटन और शिलान्यास करूंगा। इस अवसर पर पीएम-किसान की २०वीं किस्त जारी करने का भी सौभाग्य मिलेगा।
नरेंद्र मोदी



हमारे पास सबूत है कि चुनाव आयोग वोट चोरी करवा रहा है। मैं १००% सबूतों के साथ ये बात कह रहा हूं। हम जैसे ही ये सबूत सबके सामने रखेंगे, पूरे देश को पता चल जाएगा कि चुनाव आयोग वोट चोरी करा रहा है। किसके लिए करा रहा है- इगझ के लिए करा रहा है। हमें मध्य प्रदेश में संदेह था, लोकसभा चुनाव में संदेह था, महाराष्ट्र विधानसभा चुनाव में संदेह था।
यशोमती ठाकूर



सावली बार मधला ऑर्केस्ट्रा परवाना योगेश कदम यांनी परत करणे हा निव्वळ सारवासारव करण्यासाठी घेतलेला बचावात्मक पवित्रा आहे. आईच्या नावे डान्सबार चालवणाऱ्या व्यक्तीला राज्याच्या गृहराज्यमंत्री पदावर ठेवणे कितपत योग्य आहे?
सुषमाताई अंधारे



रोज़गार के सपनों को कुचलती डंडों की मार, नौकरी मांगने पर क्यों होता युवाओं पर वार? दंगाइयों पर फूल, छात्रों पर बर्बरता, ये कैसा अन्याय, ये कैसा व्यवहार? ड्ड्उ-उत्र्ङ जैसी परीक्षाओं में पेपर लीक, परीक्षा रद्द, भ्रष्टाचार और तकनीकी गड़बड़ियों से युवा परेशान हैं। ३१ जुलाई को दिल्ली में शांतिपूर्ण प्रदर्शन करके अपनी आवाज बुलंद कर रहे छात्रों व शिक्षकों पर लाठीचार्ज बेहद शर्मनाक है। चंद्रशेखर आझाद



# भारत आता रशियाकडून तेल खरेदी करणार नाही...

## डोनाल्ड ट्रम्प यांचा मोठा दावा

वॉशिंग्टन: अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारत आता रशियाकडून कच्चे तेल खरेदी करणे थांबवू शकतो, अशी शक्यता वर्तवली आहे. तसेच जर भारताने असे काही केले तर ते चांगले पाऊल असेल असे देखील त्यांनी म्हंटले आहे. मात्र याबद्दल पुढे बोलताना ट्रम्प यांनी नेहमीसारखेच हवेत बाण सोडले, हे वृत्त किती अचूक आहे याबद्दल योग्य माहिती नसल्याचे देखील त्यांनी कबूल केले.

भारत गेल्या अनेक वर्षांपासून मित्र देश रशियाकडून कच्चे तेल विकत घेत आहेत. ज्याच्या विरोध अनेक वेळा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष करताना दिसून आले आहेत. त्यामुळे टेरिफची भीती दाखवत पुन्हा एकदा ट्रम्प यांनी भारत आणि रशिया तेल व्यवहाराबद्दल भाष्य केले आहे.

भारताच्या रशियाकडून तेल खरेदीबद्दल मोठे विधान

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताच्या रशियाकडून तेल खरेदीबद्दल मोठे विधान केले आहे. ते म्हणाले की मला वाटते की भारत आता रशियाकडून तेल खरेदी करणार नाही. कारण हे मी ऐकले आहे, मात्र ते कितपत खरे आहे याची मला माहिती नाही.

वृत्तसंस्था एएनआयनुसार, जेव्हा ट्रम्प यांना विचारले गेले की त्यांनी भारतावर दंड लादण्याची किंवा पंतप्रधान नरेंद्र मोदींशी बोलण्याची काही योजना आखली आहे का? तेव्हा ट्रम्प म्हणाले की मी असे ऐकले आहे की, भारत आता रशियाकडून तेल खरेदी करणार नाही. मी हे फक्त ऐकले आहे, परंतु ते खरे आहे की नाही हे मला माहित नाही. जर तसे असेल तर ते एक चांगले पाऊल आहे. आता पुढे काय होते ते पाहूया.

रशिया-युक्रेन युद्धादरम्यान रशियाच्या तेल विक्रीतून मिळणारे उत्पन्न मर्यादित करण्यासाठी



अमेरिकेवर जागतिक दबाव येत असताना ट्रम्प यांचे हे वक्तव्य समोर आले आहे.

भारत हा जगातील तिसरा सर्वात मोठा तेल आयातदार आहे आणि पाश्चात्य निर्बंधांनंतर २०२२ पासून तो रशियाकडून सवलतीच्या दरात तेल खरेदी करत आहे. तथापि, अलीकडील माध्यमांच्या वृत्तांनुसार, भारतीय सरकारी तेल कंपन्यांनी सध्या रशियाकडून खरेदी करणे बंद केले आहे. याचे कारण रशियाकडून देण्यात येणाऱ्या सवलतींमध्ये झालेली घट आणि शिपिंगशी संबंधित समस्या आहेत. मात्र, भारत सरकारने अद्याप याची अधिकृतपणे पुष्टी केलेली नाही.

# दौंडच्या यवतमध्ये २ समाजात वाद अन् तणाव



## आक्षेपार्ह पोस्टनंतर दगडफेक, जाळपोळ; पोलिसांनी फोडल्या अश्रूधुराच्या नळकांड्या

पुणे /प्रतिनिधी

पुण्याच्या दौंड तालुक्यातील यवत येथे दोन गटांत जातीय तणाव निर्माण झाला आहे. व्हॉट्सपवरील एका आक्षेपार्ह पोस्टमुळे हा वाद भडकला. त्यात दोन्ही गटांनी एकमेकांवर दगडफेक केली. त्यानंतर पोलिसांनी वेळीच घटनास्थळी धाव घेऊन स्थितीवर नियंत्रण मिळवले. सध्या या ठिकाणी तणावपूर्ण शांतता आहे. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांकडून या घटनेची माहिती घेतली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही थेट घटनास्थळी स्थितीचा आढावा घेतला.

यासंबंधीच्या माहितीनुसार, दौंड तालुक्यातील यवत गावातील एका समुदायाच्या तरुणाने शुक्रवारी सकाळी सोशल मीडियावर एक आक्षेपार्ह पोस्ट केली. या पोस्टची माहिती मिळताच गावात तणाव निर्माण झाला. त्यानंतर दुपारी १२ च्या सुमारास यवतचा आठवडी बाजार बंद करण्यात आला. यावेळी एका गटाच्या लोकांनी काही दुचाकी पेटवून दिल्या. या घटनेमुळे गावात तणावपूर्ण स्थिती उद्भवली. यवतचे पोलिस निरीक्षक नारायण देशमुख यांनी सांगितले की, आक्षेपार्ह तरुणाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्याची चौकशी सुरू आहे. सध्याचा तणाव पाहता गावात मोठा बंदोबस्त वाढवण्यात आला आहे.

पोलिसांच्या हस्तक्षेपामुळे अनर्थ टळला

पोलिसांच्या माहितीनुसार, आक्षेपार्ह पोस्ट करणारा तरुण यवतच्या सहकार नगर भागात राहतो. पोस्टनंतर संतप्त जमावाने त्याच्या घराची तोडफोड केली. यावेळी काही लोकांनी एका धार्मिक स्थळावर दगडफेकही केली. यामुळे तणाव वाढला. पण पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केल्यामुळे पुढील अनर्थ टळला. या घटनेचे अनेक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झालेत.

उल्लेखनीय बाब म्हणजे गत शनिवारी २६ जुलै रोजी यवतच्या नीळकंठेश्वर मंदिरात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचा कथित अवमान झाला होता. या घटनेमुळे निर्माण झालेला तणाव काहीसा निवळला होता. पण त्यानंतर लगेचच ही घटना घडल्यामुळे येथील तणावात मोठी वाढ झाली आहे.

या घटनेची माहिती मिळताच जिल्हा पोलिस अधीक्षक (ग्रामीण) संदीप गिल यांनी यवतच्या दिशेने धाव घेतली. त्यांनी पोलिसांना स्थिती नियंत्रणात आणण्यासाठी योग्य ते निर्देश दिले. यावेळी बोलताना ते म्हणाले, एका तरुणाने आक्षेपार्ह स्टेटस ठेवल्यामुळे गावात तणाव निर्माण झाला होता.

# महादेव मुंडे हत्या प्रकरणात ४ आरोपींना अटक

बीड (प्रतिनिधी)

जिल्ह्यातील बहुचर्चित महादेव मुंडे हत्या प्रकरणात अखेर ४ आरोपींना अटक करण्यात आली आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी एका पोस्टद्वारे ही माहिती दिली आहे. महादेव मुंडे यांच्या पत्नीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतल्यानंतर दुसऱ्याच दिवशी ही कारवाई झाल्यामुळे या प्रकरणी आता मोठ्या घडामोडी घडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

परळी येथील व्यापारी तथा पिग्मी एजंट महादेव मुंडे यांची २१ ऑक्टोबर २०२३ रोजी निघृण हत्या करण्यात आली होती. त्यांचा मृतदेह परळी तहसील कार्यालयासमोरील मैदानात आढळला होता. या प्रकरणी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पण अद्याप एकाही आरोपीला अटक करण्यात आली नव्हती. अखेर महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी गुरूवारी या प्रकरणी मुख्यमंत्री महादेव मुंडे यांची भेट घेतली. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणाच्या एसआयटी चौकशीचे आदेश दिले. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी म्हणजे शुक्रवारी या प्रकरणी ४ आरोपींना अटक करण्यात आली. या प्रकरणी आरोपींची नावे कळली नाहीत. पण ही एक मोठी कारवाई असल्याचे मानले जात आहे.

उशिराने का होईना तपासाला मुहूर्त मिळाला





आमदार रोहित पवार यांनी एका ट्विटद्वारे या अटकसत्राची माहिती दिली. ते या प्रकरणी म्हणाले की, महादेव मुंडे हत्या प्रकरणात चार आरोपीना आज सकाळी अटक करण्यात आली असून दोन वर्षे उशिराने का होईना अखेर पोलिस तपासाला आज मुहूर्त मिळाला असेच म्हणावे लागेल.

मुख्यमंत्र्यांची भेट घेतल्यानंतर पोलिसांनी कारवाईला सुरवात केली यावरून राजकीय दबावामुळे पोलीस यंत्रणांचे हात बांधले गेले होते का ? मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन नमस्कार केला तरच पोलिस कारवाईला सुरवात करतात का? ज्यांना न्याय हवाय अशा सर्वांनी मुख्यमंत्र्यांच्या भेटीसाठी वर्षा बंगल्यासमोर रांग लावायची का? असे प्रश्न आज निर्माण होतात. असे असेल तर राज्यातली बिघडलेली कायदा सुव्यवस्था बघता लांबच लांब रांगा रांग लावायची का? असे प्रश्न आज निर्माण होतात. असे असेल तर राज्यातली बिघडलेली कायदा सुव्यवस्था बघता लांबच लांब रांगा लागतील.

असो, या महादेव मुंडे हत्या प्रकरणातील जो मुख्य आरोपी खुलेआम फिरत होता तो आता फरार असून त्याच्या देखील मुसक्या पोलीस लवकरच आवळतील ही अपेक्षा. एसआयटी तपासाच्या माध्यमातून मुंडे कुटुंबाला लवकर न्याय मिळावा व बीड जिल्हा दहशतमुक्त व्हावा यासाठी मुख्यमंत्री व पालकमंत्री यांनी 'राजकीय मैत्री' बाजूला सारून विशेष लक्ष पुरवावे ही विनंती, असे त्यांनी म्हटले आहे.

## महाराष्ट्र सरकार कडून ईडब्ल्यूएस प्रवर्गाला

# आरक्षण देण्याचा निर्णय रद्द

मुंबई : खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी १० टक्के आरक्षण लागू करण्याचा निर्णय सरकारने अखेर रद्द केला आहे आणि यावर्षी प्रवेश पूर्वीप्रमाणेच असतील. विद्यार्थ्यांच्या पालकांनी आणि शिक्षण क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी तीव्र आक्षेप घेतल्यानंतर, सरकारने या संदर्भात अधिकृत स्पष्टीकरण दिले.

वैद्यकीय शिक्षण विभागाने स्पष्ट केले की जागा वाढवल्याशिवाय ईडब्ल्यूएस आरक्षण लागू केले जाणार नाही. पालक आणि कार्यकर्त्यांच्या शिष्टमंडळाने वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांची भेट घेऊन आपली नाराजी व्यक्त केली. या चर्चेनंतर, विभागाने बुधवारी आरक्षण धोरणावर एक नवीन अर्थ लावला.यावर्षी पहिल्यांदाच सीईटी प्रवेश पुस्तिकेत खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये ईडब्ल्यूएस आरक्षणाचा उल्लेख होता, तर यापूर्वी कोणतीही अधिकृत अधिसूचना किंवा घोषणा नव्हती, ज्यामुळे पालकांना मोठा धक्का बसला. सर्वोच्च न्यायालयाने ईडब्ल्यूएस आरक्षण लागू करताना जागा



वाढवणे अनिवार्य असल्याचा निर्णय दिला आहे.

राज्य सरकारने नाशिक, धुळे, नंदुरबारसह आठ आदिवासी बहुल जिल्ह्यांमधील जिल्हास्तरीय गट-क आणि गट-ड संवर्गातील पदांसाठी सुधारित आरक्षण आणि गुणसूची निश्चित केली आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखालील आरक्षण उपसमितीने केलेल्या शिफारशीनंतर हा निर्णय घेण्यात आला आहे .

## दादा... जुगारी व्यक्तीला औकाफ मंत्रालय देणं

# हा तर मुस्लिम समाजाचा अपमान - हाजी इर्शादभाई

पुणे - लोकशाहीच्या पवित्र विधीमंडळ वास्तूत अधिवेशन काळात रमी म्हणजेच जुगार खेळणाऱ्या व आपल्या बेताल वक्तव्याने दिलेल्या खात्यांचा म्हणजेच कृषी खात्याचा व शेतकऱ्यांचा अपमान करणाऱ्या असंवेदनशील, वाचाळवीर व्यक्तीला क्रिडा, अल्पसंख्यांक विकास व औकाफ मंत्रालय अथवा विभाग देणे म्हणजेच त्या खात्यांचे महत्त्व कमी करून मुस्लिम अल्पसंख्यांक समाजाची खिल्ली उडवून अपमान करणे होय. असे स्पष्ट प्रतिपादन समस्त मुस्लिम जमात, महाराष्ट्र चे प्रदेशाध्यक्ष / सदर हाजी इर्शादभाई यांनी केले आहे.

कृषिमंत्री म्हणून कार्यरत असताना माणिकराव कोकाटे हे मंत्री झाल्यापासून सतत वादग्रस्त राहिले असून त्यांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करावी म्हणून संपूर्ण राज्यात अनेक आंदोलने झाली परंतु मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांची हकालपट्टी न करता त्यांना क्रिडा, अल्पसंख्यांक विकास व औकाफ मंत्रालयासारखे महत्वाचे विभाग व खाते देऊन सरकारने त्या खात्यांचे महत्त्व व उंची कमी करून मुस्लिम समाजाच्या व धर्माच्या औकाफ सारख्या महत्त्वाच्या व पवित्र असणाऱ्या विषयाची खिल्ली उडवून अपमान केला आहे. औकाफ मंत्रालयात पूर्णपणे धार्मिक व पवित्र स्थळांबद्दलचे निर्णय घेण्यात येत असल्याने संबंधित विभाग तथा मंत्रालय हे रमीपटू अथवा जुगारी व्यक्तीकडे देऊ नये अन्यथा मुस्लिम अल्पसंख्यांक समाजाला येत्या काळात विचार करावा लागेल असा इशारा हाजी इर्शादभाई यांनी दिला आहे.

ज्या व्यक्तीला विधीमंडळ व अधिवेशनाचे पावित्र्य व महत्त्व कळत नाही, सतत वादग्रस्त वक्तव्य करून वारंवार शेतकऱ्यांचा अपमान करणाऱ्या असंवेदनशील, वाचाळवीर,रमीपटू व जुगारी व्यक्तीला क्रिडा, अल्पसंख्यांक विकास व औकाफ मंत्रालय देणं म्हणजेच त्या मंत्रालयाचे व विभागांचे महत्त्व व उंची कमी करणे होय अशी टिका हाजी इर्शादभाई यांनी केली आहे.

संबंधित वादग्रस्त व्यक्तीला अशा महत्वपूर्ण विभागांची व मंत्रालयाची जबाबदारी देण्यात येऊ नये. मुस्लिम अल्पसंख्यांक समाजाचा अशा व्यक्तींवर विश्वास नसून तातडीने संबंधित मंत्रालय तथा विभाग त्यांचेकडून काढून घेण्यात यावा अशी मागणीही हाजी इर्शादभाई यांनी केली आहे.

# अन्यथा बीड जिल्हा बंद

## महादेव मुंडे खून प्रकरण! आठ दिवसात आरोपींना अटक करा

बीड - पुढील आठ दिवसात महादेव मुंडे खून प्रकरणातील आरोपी अटक करा नाहीतर बीड जिल्ह्यात कडकडीत बंद करण्यात येणार असल्याचा इशारा मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे. परळीतील व्यापारी महादेव मुंडे यांच्या खून प्रकरणात मुंडे कुटुंबाला न्याय मिळण्याच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या उपस्थितीत आज व्यापक बैठक बोलावण्यात आली होती. या बैठकीत महादेव मुंडे यांचे कुटुंब, सरपंच देशमुख यांचे भाऊ धनंजय देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.

मुंडे कुटुंबाला न्याय मिळेपर्यंत लढा सुरू राहणार, बैठकीत निर्णय

या बैठकीतून मनोज जरांगे पाटलांनी थेट धनंजय मुंडे यांच्यावर निशाणा साधला. आमचे वैर मुंडे बहीण भावाशी नाही. पुढील आठ दिवसात मुंडे हत्या प्रकरणात आरोपी अटक झाले नाही. तर बीड जिल्हा कडकडीत बंद राहील असा निर्णय घेण्यात आला. जरांगे पाटील यांचे भाषण सुरू असताना मुंडे कुटुंब हुंदके देत रडू लागले. मुंडे कुटुंबाला न्याय मिळेपर्यंत लढा सुरू राहील असा निर्धार या बैठकीतून करण्यात आला. २९ ऑगस्ट रोजी मराठा आरक्षणासाठी मुंबईत मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला केले. मराठा आरक्षणाचा लढा संपल्यानंतर मुस्लिम समाजासाठी लढणार असल्याचं जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.

### महादेव मुंडे हत्या प्रकरणात ४ आरोपींना अटक:आमदार रोहित पवार यांची माहिती, २ वर्षे उशिराने पोलिसांना आज मुहूर्त मिळाल्याचा टोला

बीड - बीड जिल्ह्यातील बहुचर्चित महादेव मुंडे हत्या प्रकरणात अखेर ४ आरोपींना अटक करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी एका पोस्टद्वारे ही माहिती दिली आहे. महादेव मुंडे यांच्या पत्नीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतल्यानंतर दुसऱ्याच दिवशी ही कारवाई झाल्यामुळे या प्रकरणी आता मोठ्या घडामोडी घडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. परळी येथील व्यापारी तथा पिग्मी एजंट महादेव मुंडे यांची २१ ऑक्टोबर २०२३ रोजी निर्घृण हत्या करण्यात आली होती. त्यांचा मृतदेह परळी तहसील कार्यालयासमोरील मैदानात आढळला होता. या प्रकरणी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पण अद्याप एकाही आरोपीला अटक करण्यात आली नव्हती. अखेर महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी गुरूवारी या प्रकरणी मुख्यमंत्री महादेव मुंडे यांची भेट घेतली. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणाच्या एसआयटी चौकशीचे आदेश दिले. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी म्हणजे शुक्रवारी या प्रकरणी ४ आरोपींना अटक करण्यात आली. या प्रकरणी आरोपींची नावे कळली नाहीत. पण ही एक मोठी कारवाई असल्याचे मानले जात आहे.



### २१ ऑक्टोबर २०२३ रोजी महादेव मुंडे यांचा खून झाला, २० महिन्यानंतरही आरोपींना अटक नाही

२१ ऑक्टोबर २०२३ रोजी महादेव मुंडे यांचा खून झाला होता. २२ ऑक्टोबर रोजी १२:१५ ते १:३० असे सव्वा तास परळी उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदन चालले. पोलिसांनी पंचनामा केला तेव्हा त्यात अंगावर जखमा झाल्याने मृत्यू झाल्याचे नमूद करण्यात आले होते. त्यांच्या अंगावर रक्ताने माखलेली पांढरी बनियान, ब्राऊन कलरचा शर्ट होता. लाल करदोडा आणि पाकीट होते. चेहरा, छाती आणि हात रक्ताने माखलेले होते. सव्वा तास हे पीएम चालले होते. या घटनेला तब्बल २० महिने लोटले त्यानंतरही यातील आरोपी निष्पन्न नाहीत. त्यामुळेच महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी आत्महत्येचा प्रयत्न करत आपलं जीवन संपवण्याचा प्रयत्न केला होता



साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंती निमित्ताने साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक बीड शहर या ठिकाणी जाऊन अभिवादन केले व भारतीय जनता पार्टी जिल्हा कार्यालय या ठिकाणी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली याप्रसंगी भारतीय जनता पार्टीचे सर्व जिल्हा व शहर पदाधिकारी कार्यकर्ते



डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील प्राणिशास्त्र विभागातील विद्यमान प्राध्यापक तथा माजी प्राचार्य डॉ.रामराव चव्हाण सर यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त विद्यापीठात निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले. या निमित्ताने त्यांचा सत्कार करून अभिनंदन केले,यावेळी विद्यापीठ प्राधिकरणातील अधिकारी डॉ.राजेश करपे सर, डॉ फुलचंद सलामपुरे सर, डॉ आर जे सावंत सर,जनसंपर्क अधिकारी डॉ.संजय शिंदे, डॉ बी एल चव्हाण सर,प्रा. अमर शेख सर आणि सलीमभाई उपस्थित होते.

## स्वसंवेद्या साधनापीठ । आत्मशोधाचा दिव्य प्रवास, त्र्यंबकेश्वर भूमीतील अध्यात्माचा नवा दीपस्तंभ

भारतीय अध्यात्मातील सर्वोच्च तत्त्वज्ञान म्हणजे स्वतःचा शोध घेणे. उपनिषदांमध्ये म्हटलं आहे आत्मा वा अरे द्रष्टव्यः, श्रोतव्यो मन्तव्यो निदिध्यासितव्यः म्हणजे आत्म्याला जाणणे, ऐकणे, विचार करणे आणि त्यावर ध्यान करणे हेच खरे ज्ञान आहे. भगवद्गीतेत श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत्। याचा अर्थ, माणसाने स्वतःच्या आत्मशक्तीच्या बळावर स्वतःचा उद्धार करावा. जो स्वतःला ओळखतो, आत्म्याचं खरं स्वरूप जाणतो, तोच खऱ्या अर्थाने मुक्त आणि समाधानी होतो.

आजच्या आधुनिक, धावपळीच्या आणि ताणतणावाच्या जीवनात माणूस स्वतःपासून दूर गेला आहे. बाहेरील यश आणि भौतिक सुखाच्या मागे धावताना अंतर्मनाशी संवाद साधण्याची संधीच उरली नाही. आत्मभान, आत्मचिंतन आणि जीवनाचं खरं उद्दिष्ट शोधण्यासाठी ना वेळ उरला आहे ना योग्य दिशा. अशा वेळी स्वसंवेद्या साधनापीठ ही एक दिव्य संकल्पना अध्यात्माचा खरा दीप प्रज्वलित करण्यासाठी उभी राहते. हे साधनापीठ ते ठिकाण आहे जिथे मौन बोलतं, आत्मा जागतो आणि साधक खऱ्या आत्मज्ञानाकडे वाटचाल करतो.

या साधनापीठाची प्रेरणा परमपूज्य स्वामी डॉ. तुळशीरामजी गुट्टे महाराज यांच्या तपस्वी आणि साधनामय जीवनातून आली आहे. नाशिक नगरी ही त्यांच्या तपश्चर्येची साक्षीदार राहिली आहे. या पवित्र भूमीत त्यांनी अनेकदा नऊ महिने सलग मौन केले.कधी महिना, कधी पंचेचाळीस दिवस असे अनेक वेळेला मौन अनुष्ठान केले आहेत. या मौन साधनेतून त्यांना मिळालेला स्वयं अनुभव, ध्यानातील गूढता आणि आत्मज्ञानाचा तेजस्वी प्रकाश आजही त्यांच्या प्रवचनांमधून प्रकट होतो. हे मौन अनुष्ठान म्हणजे अध्यात्मिक प्रवासातील दीपस्तंभ आहेत जे आज हजारो साधकांसाठी प्रेरणेचा स्रोत ठरले आहेत.



स्वामीजी नेहमी सांगतात माणसाने स्वतःला शोधलं पाहिजे. जेव्हा तो स्वतःला ओळखतो, तेव्हाच त्याचा खरा उद्धार होतो. इतरांकडून ऐकलेल्या ज्ञानापेक्षा अंतर्मनातून स्वयंप्रेरणेने आलेलं ज्ञान हे हजार पटीने सामर्थ्यशाली असतं. हेच गीतेचं सत्य आहे. ज्ञानाचं खऱ्या अर्थाने आत्मसात करणं तेव्हाच शक्य होतं जेव्हा साधक स्वतःच्या अंतर्मनात डोकावतो.

नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर ही भूमी या साधनापीठासाठी निवडली गेली आहे. ही भूमी बाराही ज्योतिर्लिंगांपैकी एक, महादेवाची दिव्य नगरी आहे. गोदावरी नदीचा उगम इथेच होत असून, शतकानुशतकं ऋषी-मुनींनी या पवित्र स्थळी तप, ध्यान आणि साधना करून आत्मज्ञानाची ज्योत प्रज्वलित केली आहे. त्र्यंबकेश्वरच्या निसर्गसंपन्न वातावरणात अध्यात्मिक कंपनं जाणवतात, जी साधकाच्या आत्मशोध प्रवासाला सामर्थ्य आणि शांतता प्रदान करतात.

स्वसंवेद्या साधनापीठ हे केवळ ध्यानधारणा किंवा योगाचं केंद्र नाही तर हे एक आत्मिक विज्ञानाची प्रयोगशाळा आहे. येथे साधकांना मौन साधना, योग, मंत्र, शास्त्रशुद्ध ध्यानपद्धती आणि आत्मशोधनाच्या विविध टप्प्यांचा सखोल अनुभव मिळेल. ज्योती त्राटक हाही साधना प्रकार येथे अनुभवता येईल. निसर्गाच्या सान्निध्यात साधकाचं अंतर्मन शांत होतं, आत्मज्योती प्रज्वलित होते आणि खऱ्या अर्थाने आत्मसाक्षात्काराचा दिव्य अनुभव साध्य होतो. या साधनापीठात प्राचीन भारतीय परंपरा आणि आधुनिक विज्ञानाचा सुंदर संगम घडवून आणला जाईल.

हा प्रकल्प त्र्यंबकेश्वरच्या दिव्य ऊर्जेच्या भूमीत उभा राहून, हजारो साधकांना आत्मज्ञान, आत्मशक्ती आणि आत्मसाक्षात्काराचा मार्ग दाखवणार आहे. हे केंद्र प्रत्येक जिज्ञासूला त्याच्या अंतर्मनातील देवत्व शोधण्याची, अनुभवण्याची आणि उजळवण्याची संधी देईल.

अर्जुनकुमार फड
मो.९९२१३८१००५
सिद्धिविनायक मानव कल्याण मिशन, महाराष्ट्र राज्य

## शिवशाही बस आणि ऑटोरिक्षा धडकेत एक जागीच ठार

परळी (प्रतिनिधी)

परळी-बीड मार्गावर पांगरी तांडा परिसरात शुक्रवार (दि १) रोजी सकाळी नऊच्या सुमारास भीषण अपघात झाला. बीडहून नांदेडकडे जाणाऱ्या शिवशाही एसटी बसने रिक्षाला जोरदार धडक दिल्याने रिक्षाचालक जागीच ठार झाला. या घटनेने परिसरात तणाव निर्माण होऊन काही काळासाठी वाहतूक ठप्प झाली होती.



मृत रिक्षाचालकाचे नाव श्रीनिवास शिवाजी राठोड (वय २३, रा. पांगरी तांडा) असे आहे. त्यांनी रिक्षातून काही प्रवाशांना कामाच्या ठिकाणी सोडल्यानंतर पांगरी रोडने तांड्याकडे परतत असताना शिवशाही बसने (एमएच ०४ एफएल ०९८८) त्यांना जोरदार धडक दिली. या अपघातात रिक्षा काही अंतर फरफटत गेल्याने श्रीनिवास राठोड यांचा जागीच मृत्यू झाला.अपघातानंतर संतप्त नागरिकांनी एसटी बसच्या काचा फोडल्या. घटनास्थळी तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. प्रवाशांनीही घटनास्थळी उतरून मदतीचा हात दिला. दरम्यान, परळी ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मजहर सय्यद, उपनिरीक्षक शेख, सहाय्यक फौजदार लक्ष्मण टोले, जमादार दत्ता उबाळे, रमेश तोटेवाड, सुनील अन्नमवार आदींनी घटनास्थळी तात्काळ धाव घेत वाहतूक सुरळीत केली व परिस्थिती नियंत्रणात आणली. या घटनेची नोंद परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात करण्यात येत असून, पुढील तपास सुरू आहे.



मकरंद चिनके /गंगाखेड


येथील सकल मराठा समाज बांधवांच्या वतीने मराठा आरक्षण संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या वाढदिवसाच्या निमित्त (दिनांक १ ऑगस्ट शुक्रवार) रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटक म्हणून गंगाखेड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्रीकांत डोंगरे यांची प्रमुख उपस्थिती होतीआयोजित शिबिरामध्ये एकूण २०४ रक्तदात्यांनी आपले अनमोल रक्तदान केले यामध्ये सामाजिक एकतेचा संदेश देत २५ ओबीसी बांधवांनी सुद्धा रक्तदान केले

### बेधडक

#### सत्तेचे फासे....!

कोण जास्त फोडतोय
महायुतीत स्पर्धा रंगतेय,
विरोधी पक्षांवर महायुती
रोजचेरोज वरचढ ठरतेय..!

एकमेकांवर ओरडूनही महायुतीची
सत्तेसाठी आगेकूच दिसतेय,
सत्तेचे न उलगडणारे फासे
महायुतीला चांगलेच कळतेय..!!



-प्रा.एस खंडागळे
पाटोदा (बीड)
मो.९६५७२८४४४४

दैनिक जय महाभारत संपादक - विजयकुमार वाव्हळ

हे पत्र, मुद्रक, प्रकाशक व मालक विजयकुमार सुखदेव वाव्हळ यांनी सुयोग ऑफसेट प्रिंटर्स येथे छापुन निर्मिती प्रिंटस् कबाड गल्ली, जुन्या पोलीस स्टेशन समोर, बीड ४३११२२ येथुन प्रकाशित केले.
संपादक - विजयकुमार वाव्हळ Mo.9028429999 / 9657299999 :: कार्यकारी संपादक ::प्रथमेश विजयकुमार वाव्हळ Mo.9075409999
RNI.NO.MAHMAR/2015/64418 मुख्य कार्यालय :- प्रथमेश गॅस एजन्सी, पहिला मजला गेवराई - बीड रोड गेवराई ता.गेवराई जि. बीड - ४३११२७
संपर्क -Mo.9403825700/94058 17999 jaymahabharat2015@gmail.com ✻ टीप : या अंकातील प्रसिध्द झालेल्या प्रत्येक बातमीशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

## महाराष्ट्र माझा, कष्टकरी जनांचा! – लोकशाहीर अण्णाभाऊ साठे

# महात्मा ज्योतिबा फुले माध्यमिक विद्यालयात लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त अभिवादन

माजलगाव : अमर साळवे (दै.महाभारत)

येथील महात्मा ज्योतिबा फुले माध्यमिक विद्यालय येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम उत्साहात आणि सन्मानपूर्वक पार पडला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे पर्यवेक्षक श्री. एस. एस. देशमुख सर होते. प्रमुख उपस्थिती म्हणून विभाग प्रमुख श्री.एस. के. गायकवाड सर, तसेच श्री. एम. बी. कर्णे सर यांचीही उपस्थिती




लाभली.कार्यक्रमाचे बहरदार सूत्रसंचालन बौद्धिक विभाग प्रमुख श्री. प्रवीण काळे सर यांनी प्रभावीपणे पार पाडले. विद्यार्थ्यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या कार्यावर आधारित आपली मनोगते, गीते व सादरीकरणे सादर करून कार्यक्रमात रंगत आणली. कु. पायल झोडगे, कु. किंजल क्षीरसागर, कु. श्रद्धा भराटे, चि. प्रणव टकले, चि. तुषार गोडसे, कु. जवेरीया कुरेशी इत्यादी विद्यार्थ्यांनी आपला सृजनशील सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व मान्यवरांनी अण्णाभाऊ साठे यांच्या कष्टकरी वर्गासाठीच्या झुंजीची, साहित्यिक संघर्षाची आणि सामाजिक परिवर्तनासाठीच्या योगदानाची आठवण करून देत विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांमधून प्रेरणा घ्यावी, असे आवाहन केले.

## चिश्तीया महाविद्यालयामध्ये लोकशाहीर

# आणणाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी साजरी

खुलताबाद । बाबासाहेब दांडगे (दै. महाभारत)

खुलताबाद येथील चिश्तिया महाविद्यालयामध्ये साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. सुभाष बागल हे होते. डॉ. सुभाष बागल यांनी शाहीर आणणाभाऊ साठे यांच्या समग्र जीवनावर प्रकाश टाकला. लोकशाहीर आणणाभाऊ साठे यांनी सर्वसामान्य माणसांच्या जीवनाचे प्रश्न, त्यांचे जगणे, त्यांच्या समस्या आपल्या साहित्यातून अधोरेखित केल्या. अण्णाभाऊंनी प्रदीर्घ अशा प्रकारची साहित्य निर्मिती करून वंचित बहुजनांचे जीवन आपल्या साहित्यातून मुखर केले. दलित साहित्यामध्ये अण्णाभाऊंचे नाव वरच्या क्रमांकावर आहे. दलित साहित्य निर्मितीचे ते प्रेरणास्थान आहे. अण्णाभाऊंच्या साहित्यावर अजून संशोधन होण्याची गरज आहे असे टाकून डॉ. बागल म्हणाले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य सय्यद असिफ झकेरिया हे होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अशोक भालेराव यांनी केले. तर आभार डॉ. अफरोजा खातून यांनी मानले. प्रारंभी अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला व लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आले.

डॉ. सुभाष बागल यांनी बाळ गंगाधर टिळक व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. याप्रसंगी महाविद्यालयातील अनेक प्राध्यापक उपस्थित होते. प्रा. सुनील जाधव प्रा. आसाराम पवार , प्रा. अर्शिया कादरी, प्रा. शेख अफसर, प्रा.रामटेके, प्रा. मुजाहिद अर रहेमान यासह विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

# सेनगाव तालुक्यातील बाभुळगाव येथील शेतकऱ्याची कर्जाला कंटाळून आत्महत्या

सेनगाव ।गणेश सुतार (दै. महाभारत)

सेनगाव तालुक्यातील बाभुळगाव येथील वृद्ध शेतकऱ्यांनी कर्जाला कंटाळून शेतातील विहिरीत उडी मारून आत्महत्या केल्याची घटना बुधवारी दि.३० सकाळी घडली या प्रकरणी गोरेगाव पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. सेनगाव तालुक्यातील बाभुळगाव येथील शेतकरी बाजीराव वडकुते वय.७२ यांना बाभुळगाव शिवारात पाच एकर शेत आहे या शेतावर त्यांनी भारतीय स्टेट बँक शाखा खंडाळा यांच्याकडून १.९० लाख रुपयांचे कर्ज घेतले होते मात्र मागील काही वर्षात नापिकी झाल्यामुळे कर्ज कशे फेडावे असा प्रश्न त्यांच्यासमोर उभा राहिला होता त्यामुळे ते मागील काही दिवसांपासून



अस्वस्थ होते दरम्यान नेहमीप्रमाणे ते आज सकाळी साडेपाच वाजता गावालगत शेत असलेल्या शेतात फिरण्यासाठी गेले होते मात्र बराच वेळ होऊ नये ते परत आले नसल्याने त्यांच्या कुटुंबीयांनी त्यांचा शोध घेतला मात्र त्यांचा शोध लागला नाही त्यानंतर शेतातील विहिरीत पाहणी केली असता विहिरीच्या पाण्यात त्यांचा मृतदेह आढळून आला या घटनेची माहिती गोरेगाव पोलिसांना मिळताच घटनास्थळी सहायक पोलीस निरीक्षक विनोद शेळके, जमादार मंचक ढाकरे,अनिल भारती, असोले यांच्या पथकाने भेट देऊन पाहणी केली पोलिसांनी गावकऱ्यांच्या मदतीने मृतदेह बाहेर काढून उत्तरीय तपासणीसाठी गोरेगाव पोलीस ठाण्यात दाखल केला या ठिकाणी उत्तरीय तपासणी करून मृतदेह नातेवाईकांच्या हवाली करण्यात आला मयत बाजीराव वडकुते यांच्या पश्चात एक मुलगा, सून, नातवडे असा परिवार आहे याप्रकरणी गंगाधर वडकुते यांनी दिलेल्या माहितीवरून गोरेगाव पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे सदरील प्रकरणाचा तपास जमादार मंचक ढाकरे करीत आहेत.

# निफाड ला महसूल प्रशासनाचा सप्ताह आरोग्य तपासणी शिबीराने सुरू

निफाड ।रामभाऊ आवारे (दै.महाभारत)

महसूल विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेत, महसूल सप्ताहाच्या औपचारिक उद्घाटनाचा प्रारंभ १ ऑगस्ट, शुक्रवार रोजी आरोग्य तपासणी शिबिराने करण्यात आला. निफाड येथील तहसील कार्यालयात झालेल्या या उपक्रमाचे उद्घाटन प्रांताधिकारी डॉ.शशिकांत मंगरुळे यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी तहसीलदार विशाल नाईकवाडे प्रमुख उपस्थित होते.

प्रत्येक वर्षीप्रमाणे यंदाही महसूल सप्ताहात जनतेशी थेट संपर्क साधणारे व प्रशासन-जनतेत संवाद वाढवणारे विविध उपक्रम राबवले जाणार आहेत.याची सुरुवात कर्मचाऱ्यांच्या आरोग्य तपासणीने झाली असून,यात रक्तदाब, रक्तशर्करा, हिमोग्लोबिन, नेत्रतपासणी आदी चाचण्या करण्यात आल्या. या उपक्रमास कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

प्रांताधिकारी डॉ. मंगरुळे म्हणाले,महसूल प्रशासन हा जनतेच्या अडचणींवर तत्काळ कृती करणारा विभाग आहे. अधिकारी व कर्मचाऱ्यांचे आरोग्य चांगले राहणे ही विभागासाठी महत्त्वाची जबाबदारी आहे.तहसिलदार विशाल नाईकवाडे यांनी सांगितले की,महसूल सप्ताहात शालेय जनजागृती कार्यक्रम,सेवा सोयींचे वितरण, माहिती अभियान, ई-



सेवांबाबत जनजागृती,वृक्षारोपण, महिला सक्षमीकरण संवाद,अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.या शिबिरासाठी शासकीय रुग्णालयातील वैद्यकीय पथकाची मदत घेण्यात आली होती.या सकारात्मक सुरुवातीने महसूल सप्ताहाचे स्वरूप अधिक लोकाभिमुख ठरणार आहे.महसूल सप्ताहाच्या माध्यमातून सामान्य नागरिकांपर्यंत महसूल सेवा अधिक प्रभावीपणे पोहोचवण्याचा प्रशासनाचा उद्देश आहे. या उपक्रमांमुळे शेतकरी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि विशेष व्यक्तींना थेट लाभ होणार आहे. या प्रसंगी डॉ शशिकांत मंगरुळे (उपविभागीय अधिकारी निफाड),विशाल नाईकवाडे (तहसीलदार निफाड),बाबासाहेब खेडकर (प्रशासन नायब तहसीलदार),राजेंद्र वराडे (निवडणूक नायब तहसीलदार),सविता पठारे (सँगायो नायब तहसीलदार)सुनील गांगुर्डे ( नायब तहसीलदार) ,दिपाली जगताप ( दुय्यम निबंधक निफाड), प्रमोद जाधव ( उपकोषागार अधिकारी) आदी उपस्थित होते तर या कार्यक्रमात निफाड मंडळ अधिकारी प्रशांत तांबे यांचे नायब तहसीलदार पदी पदोन्नती झाले

# नाशिक जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांची बदली

## जालना जिल्हाधिकारी म्हणून पदोन्नती

नाशिक / शांतारामभाऊ दुनबळे (दै महाभारत)

नाशिक- : नाशिक जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांची पदोन्नती करत त्यांची जालना जिल्हाधिकारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी आपल्या कार्यकाळात नाशिक जिल्हा परिषदेत उल्लेखनीय कामगिरी केली असून त्यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांनी जिल्ह्यातील प्रशासनाला नवी दिशा दिली. विशेषतः 'सुपर फिफ्टी' या उपक्रमाचा मोठा प्रभाव दिसून आला. या उपक्रमाच्या माध्यमातून आदिवासी मुलींना उच्च शिक्षण व रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या. टाटा इलेक्ट्रॉनिक्स कंपनीने या उपक्रमाच्या माध्यमातून आदिवासी मुलींना थेट कायमस्वरूपी नोकऱ्या दिल्या, हे त्यांच्या प्रयत्नांचे

फलित मानले जात आहे. याशिवाय, १०० दिवसांच्या विशेष कार्यक्रमांतर्गत जिल्हा परिषदेने विविध विभागांमध्ये कार्यक्षमतेत वाढ केली. कार्यालयीन कामकाजातील शिस्त,



निधींच्या योग्य वापरावर भर,व गैरव्यवहारांवर कडक कारवाई करणे यासारख्या उपाययोजना त्यांनी राबवल्या. त्यांच्या कार्यकाळात जिल्हा परिषदेच्या नव्या प्रशासकीय इमारतीचे कामही पूर्णत्वास गेले. दरम्यान, आशिमा मित्तल यांच्या बदलीनंतर नाशिक जिल्हा परिषदेचे पुढील मुख्य कार्यकारी अधिकारी कोण असतील, याबाबत अद्याप अधिकृत घोषणा झालेली नाही. प्रशासन आणि जिल्ह्यातील नागरिक याकडे उत्सुकतेने पाहत आहेत.

# ज्ञानकुंज कानिष्ठ महाविद्यालयामध्ये लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंती साजरी

खुलताबाद / हरिदास सराटे (दै.महाभारत)

आज दिनांक १ऑगस्ट २०२५ वार शुक्रवार रोजी ज्ञानकुंज कनिष्ठ महाविद्यालय बाजार सावंगी या ठिकाणी भारतीय असंतोषाचे जनक, थोर समाज सुधारक लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी तसेच थोर साहित्तिक,लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.या वेळी लोकमान्य टिळक व अणाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन महाविदयालयाचे प्राचार्य श्री योगेश झिंजुर्के व जेष्ठ नागरीक पुंजाजी आणा यांच्या हस्ते करण्यात



आले. या वेळी महाविदयालयाचे प्रा. मनोज राणे श्रीमती योगिता पारणेरे, नितीन पवार, राम राठोड,श्रीमती वृषाली कुलकर्णी, कृष्णा चव्हाण, अविनाश गाडेकर, योगेश सुरडकर, श्रीमती सुरेखा जाधव, दिपक पाटील, राहूल गायकवाड, विकास माळी, भुषण जाधव, अविनाश कोलते, अक्षय जाधव, चोपडे मॅडम, अजिनाथ जाधव, अधिकार मॅडम, राठोड मॅडम, बनसोड मॅडम, शिपाई कारभारी धुमाळ, वहाटूळे मावशी इत्यादी उपस्थित होते.

# दिव्यांग अमोल पाटील च्या जन्मदिनी केले वृक्षारोपण व सैनिक कल्याणला मदत निधी

शिर्डी / संजय महाजन (दै.महाभारत)

विधायक उपक्रमाच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जोपासत दिव्यांग चि.अमोल शांताराम पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त अनेक सेवाभावी संस्था व जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाला आर्थिक मदत व निधी देत विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवरांच्या उपस्थितीत वृक्षारोपण केले. .यापूर्वी अमोल पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून जुलै २०२० ला कोविड महामारीच्या काळात मुख्यमंत्री सहायता निधी११००० रू.दिले वाचन संस्कृती जोपासण्यासाठी अनेक आदिवासी वाचनालय व अभ्यासिकेला एमपीएससी, यूपीएससी ,स्टाफ सिलेक्शन कमिशन, एनडीए सारख्या स्पर्धा परीक्षाची पुस्तके भेट म्हणून दिली.आज ३४व्या वाढदिवसाच्या निमित्ताने कन्हैयालाल महाराज मंदिरासाठी एक किलो पितळ खरेदीसाठी ११०० रुपये दिले.शिवाय देशाच्या कल्याणासाठी सुरक्षेसाठी अहोरात्र हृदयाचे खडे आणि रक्ताचे पाणी करणाऱ्या डोळ्यात तेल घालून,कुटुंबावर तुळशीपत्र ठेवून,सेवा बजावणाऱ्या पोलीस आणि सैनिकांप्रती कृतज्ञता म्हणून दिव्यांग अमोल पाटील यांचे कडून २१०० रुपये रोख जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाला मदत म्हणून दिले.पर्यावरणाचे जतन व संवर्धन व्हावे,या उद्देशाने वृक्षारोपण करतानाच आज वनसंवर्धन दिनानिमित्त मागील वर्षी लावलेल्या वृक्षाचे जतन व संवर्धन केले ,त्यांचे पूजन करून आज पुन्हा



साग,आवळा,आंबा, चिंच,जांभूळ, लिंबू,रेन ट्री, कनेर ,मोगरा अशा वृक्षांची लागवड करण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.पी.एम.सावळे यांनी केले व सूत्रसंचालन ईश्वर ठाकरे यांनी केले.यावेळी प्रमुख अतिथी म्हणून मा.जि.प.सदस्य एड.ज्ञानेश्वर एखंडे, संभाजीराव अहिरराव,सामोडे येथील सरपंच आरतीताई भारुडे,उपसरपंच रावसाहेब घरटे,पिंपळनेर पो. स्टे.चे ए.एस.आय.आय.जी.शिरसाट जयेश मराठे ,नेत्र विशारद डॉ.अरुण ओझरकर,ओरिसा येथील सुरेंद्र महाकुड,डॉ.विनोद कोठावदे,ए.पी.दशपुते, प्रा.सी.एन.घरटे, किशोर विसपुते, भरत बिरारीस,फकीरा बिरारीस,जगदीश शिंदे, हंसराज शिंदे,पोलीस कॉन्स्टेबल कैलास कोळी,नरेंद्र परदेशी, ग्रा.वि.अ. सुनील लाड,फुलसिंग कुवर, शिवचंद्र भदाणे,सुशिल पाटील, दिपक राजपुत,सुरेश अहिरे, चिंतामण ठाकरे,अभि महाकुड, आकाश माळीआदी मान्यवरांनी वृक्ष लागवड करून दिव्यांग अमोलचे कौतुक केले.

# सेवानिवृत्त शिक्षकाचा अनोखा उपक्रम – माई वृद्धाश्रमाला दरवर्षी पाच हजारांची मदत

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी (दै.महाभारत)

शिक्षक ही केवळ एक नोकरी नसून समाजासाठी एक सेवाभावाची भूमिका असते, याचा जिवंत प्रत्यय देणारा एक प्रेरणादायी उपक्रम शहरात नुकताच पाहायला मिळाला. श्री शिवाजी हायस्कूल, खोकडपुरा येथील माजी आदर्श शिक्षक श्री. काकासाहेब मोहनराव तुपे यांनी आपल्या सेवानिवृत्तीनंतरही समाजसेवेचा ध्यास सोडला नाही.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीचे औचित्य साधून तुपे सरांनी छत्रपती संभाजीनगर येथील 'माई वृद्धाश्रम' या सेवाभावी संस्थेला पाच हजार रुपयांची आर्थिक मदत केली. विशेष म्हणजे, ही रक्कम त्यांनी त्यांच्या पेन्शनमधून वैयक्तिकरित्या अर्पण केली असून दरवर्षी एक ऑगस्ट रोजी अशीच मदत ते वृद्धाश्रमाला देणार असल्याचेही जाहीर केले आहे.शिक्षकी जीवनात असताना तुपे सर प्रत्येक वर्षी अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथीच्या निमित्ताने विविध शाळांतील विद्यार्थ्यांना एकत्र करून वकृत्व स्पर्धांचे आयोजन करत असत. त्या स्पर्धांचा सर्व खर्च ते स्वतःच्या पगारातून करत होते. सेवानिवृत्तीनंतरही त्यांनी आपली ही समाजनिष्ठ परंपरा वृद्धाश्रमाशी जोडून



सुरू ठेवली आहे.माई वृद्धाश्रमाच्या वतीनेही तुपे सरांचे विशेष आभार मानण्यात आले. वृद्ध मातांसाठी ही रक्कम केवळ आर्थिक मदत नसून, माणुसकीची ऊब आणि आत्मियतेचा हात आहे, असे वृद्धाश्रमाच्या संचालिका मीरा वाघमारे यांनी सांगितले.

तुपे सरांचा हा उपक्रम समाजातील इतरांनीही आत्मसात करण्याजोगा असून, 'देणगी म्हणजे केवळ संपत्ती नव्हे, ती मूल्यांची देणगी असते', हे त्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले आहे.मीरा वाघमारे माई वृध्दाश्रम संचालिका मो.नं.८४२११४११०४


## बंजारा ब्रिगेडचे ऋषिकेश चव्हाण आणि धारासिंग राठोड करणार शेतकऱ्यांसाठी


# जलसमाधी आंदोलन

खुलताबाद । बाबासाहेब दांडगे (दै. महाभारत)

शेतकऱ्यांना सोय व्हावी म्हणून शासनाने दीड कोटीच्या वर रक्कम भिलदरी तांडा येथील पाझर तलावाच्या बॅकवॉटवर केटी कम पूल बांधण्यासाठी दिले.परंतु ठेकेदार आणि अधिकारी यांच्या संगनमताने व मनमानी कारभारामुळे चुकीच्या पद्धतीने हे काम करून शेतकऱ्यांना त्रास देण्याचा काम या लोकांनी केलेले आहे.या चुकीच्या कामामुळे अनेक शेतकऱ्यांनी आपल्या शेतात पेरणी केली नाही व ज्यांनी पेरणी केली त्यांना शेतात खत घेऊन जाण्यासाठी पर्यायी रस्ता करून देण्याबाबत वारंवार तोंडी, फोनद्वारे सांगूनही पर्यायी रस्ता करून दिला नाही.

म्हणून येत्या दोन दिवसात शेतकऱ्यांसाठी रस्त्याचे काम सुरू न केल्यास दिनांक ५ ऑगस्ट रोजी सर्व त्रस्त शेतकऱ्यांना सोबत घेऊन बंजारा ब्रिगेड तर्फे जलसमाधी आंदोलन करणार असल्याचा इशारा पत्राद्वारे उपविभागीय जलसंधारण अधिकारी यांना देण्यात आला आहे.





# बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी व शाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवाद

**जालना/प्रतिनिधी (दै.महाभारत)**

**जालना येथील चंदनझिरा येथील श्री शिवाजीराव शेंडगे विद्यालय येथे बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी तथा शाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक तथा जालना जिल्हा शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी पतसंस्थेचे चेअरमन बालासाहेब**




**आबुज होते प्रमुख** पाहुणे गणेशराव राऊत नगरसेवक, सतीश जाधव नगरसेवक, दशरथ थोरात समाजसेवक ,गणेशराव इंचे समाजसेवक, आनंद धोत्रे, अशोक निकाळजे उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते लोकमान्य टिळक व शाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी सर्व मान्यवरांचे शाळेचे मुख्याध्यापक बालासाहेब आबुज यांनी स्वागत केले.यावेळी गणेश राऊत यांनी आपले मनोगत व्यक्त केले.यावेळी गणेश इंचे व पप्पू जाधव यांच्या संयुक्त विद्यमानाने शालेय साहित्य वाटप करून वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी शाळेतील कर्मचारी, पालक, विद्यार्थी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राहुल मुंडे यांनी केले तर आभार प्रदर्शन कृष्णा घाडगे यांनी केले.

# पात्रुड येथील जाधवर वस्ती कडे जाणाऱ्या चिखलमय रस्त्यामुळे नागरिकांचे प्रचंड हाल

## वसंतराव नाईक तांडा सुधार योजने अंतर्गत सिमेंट रस्ता, नाली बांधकामाची मंजुरी असताना वस्तीतील नागरिकांचा चिखलातुनच पाई प्रवास

माजलगाव : अमर साळवे
(दै. महाभारत)

वसंतराव नाईक तांडा सुधार योजनेअंतर्गत मंजुर कामाची खदखद पाठपुराव्या साठी कोन्ही पुढे येत नसल्याने माजलगाव तालुक्यातील पात्रुड येथे वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजने अंतर्गत सन २०२३ - २०२४ या वर्षात कामासाठी प्रशासकीय मान्यता निधी साठी देण्यात आली असून बीड जिल्ह्यातील विविध गावांना तांडा वस्तीसाठी कामे मंजूर निधी मिळाला आहे मात्र अद्यापही अनेक गावांमध्ये तांडा वस्थेमध्ये ही कामे करण्यात आले नाहीत याची सखोल चौकशी संबंधित जिल्हास्तरीय समितीने करण्याचे आवश्यकता आहे,लोकप्रतिनिधीचे याकडे दुर्लक्ष होत आहे पात्रुड येथील धनगर वस्ती व जाधवर वस्ती या वस्तीचे मंजुर यादितील नाव चुकीने जाधव वस्ती असे झाले आहे या जाधववर वस्ती नगर साठी ०७ लक्ष रुपये आलेला निधी खर्च न करता पुढे का पाठपुरावा झाला नाही यामुळे नागरिकांना चिखल तुडवत पायी प्रवास करावा लागतो वयोवृद्ध व लहान मुलांना पायी चालनेही अवघड आहे,याकरिता वस्ती सुधार



योजना अंतर्गत करण्यात आलेला निधी खर्च करून नागरिकांचा प्रश्न मार्गी लावण्यात यावा अशी मागणी या वस्तीवरील जाधवर व नाईकवाडे कुटुंबियाकडून केली जात आहे ,या वस्तीवर तब्बल ५० पेक्षा अधिक नागरिक राहतात मात्र विकासापासून केसो दूर असलेल्या वस्तीकडे लोक प्रतिनिधींचे गेल्या अनेक वर्षापासून दुर्लक्ष होत आहे,किती नागरिकांनी मागणी केली असता मतदार संघातील काही लोकप्रतिनिधी कडून आम्हाला विचारून तुम्ही तिथे राहण्यास आला होता का असे बोलल्याचे समजते पात्रुड येथील लोकप्रतिनिधी व माजलगाव मतदार संघातील विद्यमान आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी या प्रश्नाकडे गंभीरतेने लक्ष देण्याची मागणी येथील नागरिकांतून केली जात आहे,लाखोचा निधी उपलब्ध असतानाही प्रशासनाकडून या कामाची पाहणी केली जात नाही व संबंधित कंत्राटदार कागदोपत्री कामे दाखवून लाखोचा निधी लाटतात का याकडे मात्र प्रशासनाचे व लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष होतांना दिसून येते पात्रुड येथून दीड ते दोन किलोमीटर अंतरावर असणाऱ्या या वस्तीकडे जाण्यासाठी रस्ता उपलब्ध नाही पावसाळा आला की या रस्त्यावरून पायी चालणे हे अवघड होते यामुळे येथे नागरिकांना प्रचंड मनस्ताप व रोगराईचा सामना करावा लागतो,याबाबत वारंवार लोक प्रतिनिधींना कळवूनही लोकप्रतिनिधी दुर्लक्ष करत असून नीधी मंजूर असूनही कामाचे मुहूर्त का लागले नाही अशी चिंता येथील नागरिकांमध्ये व्यक्त केले जात आहे याकडे बीड जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी लक्ष देण्याची मागणी नागरिकांतून केली जात आहे.

बीड जिल्ह्यातील विविध तालुक्यात वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजने अंतर्गत २०२३ - २०२४ करिता प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या जिल्ह्यातील कामांचा तपशील रक्कम दोन कोटी रुपये असून सदर कामे काही ठिकाणीच करण्यात आली अनेक तांडा रस्त्यावरील कामे अद्यापही रखडलेलीच असुन याची बील रक्कमही संबंधित अधिकाऱ्यांनी काही कंट्रक्शनच्या व गुत्तेदारांच्या नावाने जमा केल्याचे समजते.



# लोकमान्य टिळक व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पावन स्मृतीस विनम्र अभिवादन

कन्नड / निलेश पवार (दै.महाभारत)

जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित काशिनाथ पाटील जाधव प्राथमिक विद्यालयात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीच्या निमित्ताने विनम्र अभिवादन करण्यात आले विद्यालयाचे प्रशासकीय अधिकारी श्री सचिन भामरे सर यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले

आज झालेल्या भाषण स्पर्धेत विद्यालयातील ५० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला होता, या स्पर्धेत संस्कृती अकोलकर रिया राठोड श्रद्धा गुंजाळ सिद्धी बोडके भाग्यश्री वाकळे जानवी राठोड तनिष्का जाधव तेजस्विनी भोसले आरोही वाघ श्रद्धा पवार वेदांत धनई अभिनंदन राठोड यांनी यश संपादन केले,स्पर्धेचे परीक्षण भगवान म्हैसमाळे व सुनीता बाविस्कर यांनी केले विद्यालयातील शिक्षिका श्रीमती सुनिता दाबके मॅडम यांनी आपल्या भाषणाद्वारे या दोन्ही महान विभूतींच्या अजरामर कार्यास उजाळा दिला यावेळी दीपक जाधव दत्तात्रय गायके जगमोहन मुंडवाडकर भारत पवार योगेश जंजाळ लक्ष्मण पांडव ज्ञानेश्वर नायकुडे योगेश कुमावत संतोष आग्रे सीमा राठोड यांची उपस्थिती होती कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्तिकी सुपेकर श्रेया तायडे यांनी तर आभार जानवी राठोड हिने मानले

# श्रमिकांचा कवी अण्णाभाऊ साठे आणि लोकमान्य टिळक यांना अभिवादन!

## अण्णाभाऊ शोषित वंचित आणि समाज क्रांतीचे प्रतीक - अँड.मनोज संकाये

परळी / विकास वाघमारे
(दै. महाभारत)

**शोषित-वंचितांच्या आवाजासह सामाजिक क्रांतीचे प्रतीक ठरलेले लोककवी अण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंती तसेच लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी परळी शहरात साजरी करण्यात आली. अँड. मनोज संकाये मित्रमंडळाच्या वतीने अण्णाभाऊ साठे यांच्या परळी येथील बस स्टँड समोरील पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून त्यांना आदरांजली वाहण्यात आली.**

या कार्यक्रमात अँड. मनोज संकाये यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याचे स्मरण करून, त्यांनी दिलेल्या सामाजिक समतेच्या संदेशाचे महत्त्व पटवून दिले. अण्णाभाऊंनी आपल्या साहित्यातून आणि आंदोलनातून वंचितांचा आवाज बुलंद केला. त्यांच्या विचारांनी आजही अनेकांना प्रेरणा



दिली आहे, असे संकाये यांनी नमूद केले.

कार्यक्रमात युवकांनीही मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. पुतळा परिसर फुलांनी आणि फडकत्या झेंड्यांनी सजवून, जयघोषात साजरी झालेली ही जयंती, अण्णाभाऊंच्या सामाजिक लढ्याची आठवण करून देणारी ठरली. यावेळी अनिल चौधरी, वैजनाथ केंद्रे, शिरीष सलगरे, प्रवीण रोडे, संतोष कांबळे,राजू वायबसे, अविनाश नागरगोजे, अजय मुंडे, शिवलिंग सलगरे, देवदास मुंडे ,वसंत मुंडे, परमेश्वर मुंडे,महादेव कांदे, वैजनाथ कांबळे, बालू गित्ते,अनिल कातकडे,विनोद रोडे,मुकुंद पारधे,अंकुश रोडे, परमेश्वर मुंडे अवि गायकवाड,विजय गवळी आदीसह मित्रमंडळाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# साहित्यरान, साहित्य सम्राट डॉ. अण्णा भाऊ साठे यांची १०५ वी जयंती साजरी

वाशिम / हफीज खान
(दै.महाभारत)

कारंजा शहर स्थानिक - स्टेट बँक समोरील डॉ अण्णा भाऊ साठे चौकाची स्थापना दिनांक ११/०१/२००३ ला नगर पालिका कारंजा यांच्या पुढाकाराने स्थापना करण्यात आली या कार्यक्रमामध्ये कार्यक्रमाचे अध्यक्ष नरेंद्र शेठ गोळेच्छ व उद्घाटक म्हणून अन्न व नागरी पुरवठा ग्राहक संरक्षण मंत्री तथा पालक मंत्री वाशिम चे मा. ना. प्रा. लक्ष्मणराव ढोबळे विषेश अतिथी श्री प्रकाशदादा डहाके इत्यादींच्या उपस्थीत व प्रकाशदादा डहाके यांच्या शुभहस्ते फलकाचे अणावरण करण्यात आले होते आज तब्बल २२ वर्षांनी या चौकाचे सौंदर्याकरण व फलकाचे अणावरण येथील सामाजीक कार्यकर्ते व माजी विस्तार आधिकारी सुधाकरराव जाधव यांचे हस्ते करण्यात आले - आज दिनांक १/१/२०२५ रोजी सकाळी ९ वाजता येथील सामाजीक संस्था आदिगुंज व सामाजीक समता प्रबोधन' मंच आदिगुंज बहुउद्देशीय



संस्था कारंजा व सर्व स्तरातील समाज बांधव यांच्या वतीने अण्णा भाऊ साठे यांची १०५ की जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली या मध्ये डॉ. रमेश चंदनशिव, डॉ. कुंदन श्यामसुंदर हंसराज शेंडे, गजानन अहमदाबादकर, प्रा. झोंबाडे सर डॉ.वासुदेव भगत, प्रणिता दसरे, मंगललाई संझाड, पत्रकार संजय कडोळे श्रीकांत भाके साहेब, नाट्य परिषद प्रशासन व नंदकीशोर कव्हळकर यांनी अण्णा भाऊ साठे यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकण्यात आला व या कार्यक्रमाला प्रविण दिहाडे रामदास इंगोले प्रदीप वानखडे कैलाश बोनके अरविंद गवई विनोद धाकतोड रामेश्वर जोंधळे कमलेश धनगावकर कैलाश हांडे शामराव धनगावकर देवराव राऊत सिद्धार्थ नवघरे गोपी डेंडुळे एस.एस. चव्हाण अनिल डेरे राजू अवताडे प्रमोद धनगावकर आदित्य खंडारे कर्यक्रमाचे सूत्र संचलन आणि आभार प्रदर्शन आदीगुंज संस्था अध्यक्ष ज्ञानेश्वर खंडारे यांनी केले.

# कडुबाई खरातांच्या गाण्यांतून अण्णाभाऊंच्या गौरवाचा गोडवा

## प्रचंड जल्लोषात गेवराईच्या तरुणाईने धरला ठेका

गेवराई / प्रतिनिधी (दै.महाभारत)

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती उत्सवाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या संगीत- सांस्कृतिक कार्यक्रमात प्रसिद्ध गायिका कडुबाई खरात यांच्या गोड आवाजातील गाण्यांवर

तरुणाईने ताला-सुरात ठेका धरला. अहो, गणित बघा विचारून त्या वादळ वार्याला, अण्णाभाऊंच नाव दिलं आकाशातील ताऱ्याला, घ्या सजवून समाज मस्त, अन दाखवा पावर जबरदस्त..! या आणि अशा विविध प्रबोधनात्मक गाण्यांची बरसात करून कडुबाई खरात यांनी धमाल उडवून दिली. कडुबाई खरातांच्या गाण्यातून अण्णाभाऊंच्या गौरवाने शहरातील तरुणाईने

प्रचंड जल्लोषात ताला-सुरातठेका धरल्याने कार्यक्रमात रंगत आली.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष यशराज पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली बुधवार दि ३० रोजी सायंकाळी ८ वाजता साठेनगर येथे प्रसिद्ध गायिका कडुबाई खरात यांच्या गोड आवाजातील संगीत-सांस्कृतिक ऑर्केस्ट्रा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला वंदन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. गणित बघा विचारून त्या वादळ वार्याला, अण्णाभाऊंच नाव दिलं आकाशातील ताऱ्याला, घ्या सजवून समाज मस्त, अन दाखवा पावर जबरदस्त,भीम माझं ग, दिल्लीत भाषण देई, तुम्ही खातात त्या भारीवर बाबासाहेबांची सही हायरं, माजी मैना गावावर राहीली, राजा राणीच्या जोडीला सात मजली माडिला, सांगा कुणाचं योगदान लाल दिव्याच्या गाडीला..! गायिका कडुबाई खरात यांनी एकापेक्षा एक सरस गाणी सादर करून, कार्यक्रमात रंगत आणली. या गाण्यांवर तरुणाईने ताला-सुरात ठेका धरला.

साहित्यरत्न लोकशाहीर डॉ आण्णाभाऊ साठे सार्वजनिक १०५ व्या जयंतीनिमित्त शतनाम गायिका कडूबाई खरात यांची संगीत मैफिल गेवराईत रंगली.

साहित्यरत्न लोकशाहीर डॉक्टर अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र राज्यातील ख्यातनाम भारुड तसेच लोक प्रबोधन पर गीतकार श्रीमती कडूबाई खरात यांचा लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जीवनावर आधारित व साहित्य व आधारित लोकप्रबोधन पर गीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून माजी राज्यमंत्री

बदामराव पंडित, प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस निरीक्षक प्रवीण कुमार बांगर, संजय गांधी निराधार योजनेचे अध्यक्ष दादासाहेब घोडके, युवानेते रोहित पंडित, सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष यशराज पंडित, युवानेते शिवराज पवार, उद्धव मडके, उपाध्यक्ष प्रभाकर पिसाळ, उपाध्यक्ष अरुण मस्के, सचिव शरद मोटे, पप्पू गायकवाड, संघटक शेख अमजद बब्बु, सय्यद एजाज, किशोर वादे, कोषाध्यक्ष उद्धव मडके, रवि पवार, सहसचिव-



अण्णासाहेब राठोड, कोषाध्यक्ष -उद्धव बापु मडके, सहकोषाध्यक्ष-आबा ढाकणे, रविंद्र पवार, मार्गदर्शक -रविंद्र बोराडे, कार्याध्यक्ष - रंजित घुंबार्डे, सहकार्याध्यक्ष- शिनु भाऊ बैदरे संघटक -सय्यद एजाज, किशोर वादे, सहसंघटक -शेख अमजद बब्बु, डिजीटल प्रसिद्ध प्रमुख -रविंद्र पवार ,सदस्य प्रभाकर भालशंकर, गुफरान इनामदार, अमोल दावडकर यांनी परिश्रम घेतले.

# स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाच्या वतीने अंगणगाव येथे भव्य अण्णाभाऊ साठे जयंती मोठ्या उत्साहात साजरी

नाशिक / शांतारामभाऊ दुनबळे
(दै महाभारत)

नाशिक-: येवला तालुक्यातील अंगणगाव येथील वाचनालयात स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाच्या वतीने सालाबादाप्रमाणे अण्णाभाऊ साठे जयंती मोठ्या उत्साहात संपन्न झाली पक्षाचे जिल्हाध्यक्ष महेंद्रभाऊ पगारे तालुकाध्यक्ष विजय घोडेराव स्वारिपचे ता.कार्याध्यक्ष बाळासाहेब आहिरे राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष योगेश सोनवणे डॉ. सुरेश कांबळे अजीजभाई शेख यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून दिप प्रज्वलन करून कार्यक्रमास सुरुवात झाली कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तालुकाध्यक्ष विजय घोडेराव होते

यावेळेस स्वारीपचे ता कार्याध्यक्ष बाळासाहेब आहीरे राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष योगेश सोनवणे अजीजभाई शेख गोकुळ वाघ सर किरण जाधव सर पिटर काळे यांची भाषणे झाली यावेळेस मार्गदर्शन करताना डॉ. सुरेश कांबळे म्हणाले कि.अण्णाभाऊ साठे यांचे कार्य व विचार आत्मसात केले पाहीजे अण्णाभाऊ साठे यांची डिजे किंवा डोलीबाजा न लावता त्यांच्या कथा कादंबर्या वाचून जयंती साजरी केली पाहीजे कारण भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना त्यांनी गुरू स्थानी मानून त्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून ते म्हणतात जग बदल घालवून घाव मज सांगून गेले भिमराव म्हणून आपण सर्वांनीच त्यांच्या जयंती निमित्त संकल्प करूया कि आज निर्व्यसनी व अंधश्रद्धेवर विश्वास न ठेवता शिक्षण घेऊन आदर्श पिढी निर्माण करूया असे गौरउदगार डॉ.सुरेश कांबळे यांनी व्यक्त केलेमहेंद्र पगारे म्हणाले कि आम्ही दरवर्षीप्रमाणेच गरजू शाळेतील मुलांना वही पेन वाटप करतो व त्यानिमित्ताने अण्णाभाऊ



साठे यांनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीत फक्त दिड दिवस शाळेत गेलेले अण्णाभाऊ स्वता साक्षर बनून कलावंताना लोकनाट्यच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध करून स्वाभिमानी जीवन जगण्याची संधी निर्माण करून दिली तसेच अनेक कथा कादंबर्या वगनाट्य पोवाडे यामाध्यमातून जनजागृती केली तसेच रशिया मध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांचा पोवाडा सादर करून तेथील लोकांची मने जिंकून तरूण पिढीला नवा आदर्श प्रेरणादाई अण्णाभाऊ साठे याच्या रूपाने पहायला मिळाले असे गौरउदगार महेंद्र पगारे यांनी व्यक्त केलेप्रास्ताविक व सूत्रसंचालन बाळासाहेब आहिरे यांनी केले तर आभार विनोद त्रिभुवन यांनी मानले यावेळेस १०५ शाळेतील गरजू विध्यार्थाना एक वही एक पेन वाटप करण्यात आले यावेळेस स्वारीपचे जिल्हाध्यक्ष महेंद्रभाऊ पगारे डॉ.सुरेश कांबळे राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष योगेशभाऊ सोनवणे तालुकाध्यक्ष विजय घोडेराव स्वारिपचे ता.कार्याध्यक्ष बाळासाहेब आहिरे उपाध्यक्ष विनोद त्रिभुवन अँड.अनिल झाल्टे भानुदास गायकवाड

अजीजभाई शेख पिटर काळे मयुर सोनवणे दिवाकर वाघ बाळासाहेब सोनवणे अतुल धिवर आकाश मोरे नानाभाऊ पिंपळे सचिन जाधव राकेश कांबळे सौरव कांबळे नितीन जाधव किशोर जाधव राजु गुंजाळ अमोल गुंजाळ विजय गुंजाळ महीला आघाडीच्या आशाताई आहेर सौ.शुभांगीताई कांबळे लक्ष्मीबाई त्रिभुवन शशिकला त्रिभुवन लताबाई जाधव सुनिता राजगिरे कविता वाकळे सारीका उमप गायकवाड मॅडम दुकळे मॅडम तसेच स्वारिपचे पदाधिकारी अण्णाभाऊ साठे मित्र मंडळ अंगणगाव महीला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते

# डॉक्टर अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंतीच्या अध्यक्षपदी अनिल डोईफोडे तर सचिव पदी बबलू काळे

कोषाध्यक्षपदी बालाजी वाघमारे

भोकर/अनिल डोईफोडे (दै. महाभारत)





भोकर येथे दिनांक एक ऑगस्ट २०२५ रोजी साहित्यरत्न साहित्य कोहिनूर डॉक्टर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याच्या नियोजित जागी ध्वजारोहण करण्यात आले भोकर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रामजी कराड व यांच्या हस्ते ध्वजारोहण करून प्रतिमेचे पूजन करण्यात आले तर क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे यांच्या नियोजित जागेवर भोकर तहसीलचे कर्तव्यदक्ष तहसीलदार विनोद गुंडमवार यांच्या हस्ते लहुजी वस्ताद साळवे यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून ध्वजारोहण करण्यात आले यावेळी असंख्य सामाजिक कार्यकर्ते समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी भोकर तालुक्याचे भोकर नगर परिषदेचे माजी नगरसेवक मनोज गिमेकर, माजी नगरसेवक प्रतिनिधी तथा नगरपरिषद कर्मचारी सामाजिक कार्यकर्ते दिलीप वाघमारे

सखाराम वाघमारे शिवसेनेचे संतोष आलेवाड नामदेव वाघमारे ज्येष्ठ संपादक उत्तम बाबळे लोकमतचे पत्रकार राजेश वाघमारे लसाकमाजे माजी तालुका अध्यक्ष निवृत्त कर्मचारी माहूरकर अण्णा कॉम्रेड दिलीप पोत्रे जस्ट सामाजिक कार्यकर्ते केवाय देव कांबळे उद्योजक सखाराम वाघमारे बबलू काळे बालाजी काळे महेंद्र किनीकर चंद्रकांत बाबळे अविनाश वाघमारे परमेश्वर भालेराव गंगाधर करंदीकर असंख्य कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी ध्वजारोहणाच्या नंतर लागलीच नवनिर्वाचित अध्यक्षाची निवड करण्यात आली यावेळी सर्वानुमते

सार्वजनिक जयंती मंडळ भोकरच्या अध्यक्षपदी सर्व समाजाच्या वतीने पत्रकार अनिल डोईफोडे यांची निवड करण्यात आली व उपाध्यक्षपदी गंगाधर करंदीकर सचिव बबलू काळे कोषाध्यक्ष बालाजी वाघमारे सहसचिव के वाय देव कांबळे सह कोषाध्यक्षपदी महेंद्र किनिकर व सदस्य संतोष सूर्यवंशी संतोष झुंजारे सुधीर वाघमारे लक्ष्मण सुरेशकर सल्लागार सखाराम वाघमारे इत्यादी पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली व पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आले



# खुलताबाद तालुक्यात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी

खुलताबाद । बाबासाहेब दांडगे (दै. महाभारत)

साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची जयंती खुलताबाद तालुक्यात मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली. यावेळी खुलताबाद शहरांसह तालुक्यातील विविध गावांमध्ये जंयती निमित्ताने मान्यवरांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले.खुलताबाद येथे भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे, तालुकाध्यक्ष प्रकाश चव्हाण, माजी उपसभापती दिनेश अंभोरे, ज्ञानेश्वर बारगळ,शहराध्यक्ष परसराम बारगळ यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.यावेळी नवनाथ बारगळ,योगेश बारगळ, सुरेश मरकड,काशिनाथ तुपे, शंकर अंभोरे सह तालुक्यातील पदाधिकारी उपस्थित होते..

# खुनाचा गुन्हा उघडकीस आणणाऱ्या पोलिसाचा पोलीस महानिरीक्षक यांनी प्रशस्तीपत्र देऊन केला गौरव

श्रीगोंदा/विजय मांडे(दै.महाभारत)




श्रीगोंदा तालुक्यातील मुंढेकरवाडी (लिंपणगाव) येथील महिला दि.२९ मे २०२४ रोजी राहत्या घरातून बेपत्ता झाल्याची तक्रार श्रीगोंदा पोलीस ठाण्यात दाखल होती. बेपत्ता महिलेचा तपास सुरू असताना पो.ना ज्ञानदेव भागवत व पो. कॉ मनोज साखरे यांना महिलेच्या नातेवाईकांनी सांगितले की बेपत्ता महिला ही राजेंद्र जगन्नाथ देशमुख याच्या सोबत गेली असा संशय व्यक्त केला होता.

याबाबत सविस्तर वृत्त असे की,श्रीगोंदा तालुक्यातील मुंढेकरवाडी (लिंपणगाव) येथील महिला राहत्या घरातून बेपत्ता झाल्याची तक्रार श्रीगोंदा पोलीस ठाण्यात दाखल होती त्यानुसार श्रीगोंदा पोलीस स्टेशनचे पो.ना.ज्ञानदेव भागवत व पो. कॉ मनोज साखरे यांनी तपास सुरू केला असताना बेपत्ता महिलेच्या नातेवाईकांनी सांगितले की ही महिला राजेंद्र जगन्नाथ देशमुख व अजून एक इसम यांच्या सोबत गेली त्यानुसार त्या दोन्ही आरोपींना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी प्रेमसंबंध व जमिनीच्या वादातून बेपत्ता महिलेचा गळा आवळून हातपाय बांधून सातारा नजीक कॅनॉल मध्ये टाकून खून केल्याची कबुली दिली. त्यानंतर सातारा पोलीस स्टेशनला भादिव कलम ३०२, २०१, प्रमाणे गुन्हा दाखल असल्याची माहिती समोर आल्याने नमुद दोन्ही आरोपींना कोरेगाव पोलीस स्टेशन जि. सातारा यांच्या ताब्यात देण्यात आले होते.

याबाबत पोलीस अधिक्षक समीर शेख यांच्याकडून श्रीगोंदा पोलीस स्टेशनचे पो.ना.ज्ञानदेव भागवत व पो.कॉ.मनोज साखरे यांना २५ हजार रुपये रोख पारितोषक व प्रशस्तीपत्र जाहीर करण्यात आले होते. या उत्कृष्ट कामगिरीबाबत दत्तात्रय कराळे, विशेष पोलीस महानिरीक्षक नाशिक परिक्षेत्र नाशिक, सोमनाथ घार्गे, पोलीस अधिक्षक अहिल्यानगर यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देवुन पोलीस अधिक्षक कार्यालय अहिल्यानगर येथे गौरव करण्यात आला आहे.

तसेच श्रीगोंदा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक किरण शिंदे,सपोनि प्रभाकर निकम,पो.उपनिरीक्षक सचिन लिमकर, संपत कन्हेरे,संजय वाघमारे,नंदकुमार भैलुमे तसेच सहकारी अंमलदार यांनी देखील अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या आहेत. यापुर्वी मंदीर चोरीच्या गुन्हयात चांगली कामगिरी बाबत पो.ना. ज्ञानदेव भागवत व पो.कॉ.मनोज साखरे यांचा लिंपणगाव ग्रामपंचायत कार्यालय येथेही सन्मान करण्यात आला होता.

# आ.राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रयत्नाने नळदुर्ग येथे महावितरणचे उपविभागीय कार्यालय मंजूर

## भाजप पदाधिकाऱ्यांचा आनंदोत्सव

तुळजापूर/अजित चव्हाण (दै.महाभारत)



नळदुर्ग:-भाजपचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रयत्नामुळे नळदुर्ग येथे महावितरणचे उपविभागीय कार्यालयास अखेर शासनाने दि.१ ऑगस्ट रोजी मंजुरी दिली आहे. त्यामुळे नळदुर्ग शहर व ग्रामीण भागातील नागरिकांची गैरसोय दुर होणार आहे. या निर्णयाचा भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी शहरात फटाक्यांची आतषबाजी करत व साखर वाटप करुन जल्लोष साजरा केला आहे.

दहा वर्षापूर्वी पासुन महावितरणचे नळदुर्गला उपविभागीय कार्यालय व्हावे यासाठी पाठपुरावा सुरु होता. तुळजापूर पंचायत समितीचे तत्कालीन सदस्य तथा भारतीय जनता पार्टीचे साहेबराव घुगे यांनी सतत पाठपुरावा केला. घुगे यांनी पंचायत समिती सर्वसाधारण सभेत महावितरणचे उपविभागीय कार्यालय नळदुर्ग येथे व्हावे या मागणीचा ठराव मांडला होता. महावितरणच्या आधिकाऱ्यानी, तत्कालीन ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यासंदर्भात शासनास प्रस्ताव दिला. सन २०१९ मध्ये सरकार बदलल्याने हा विषय प्रलंबित राहिला होता. त्यानंतर पुन्हा राज्यात महायुतीचे सरकार आल्याने आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी हा विषय शासन दरबारी लावुन धरले. अखेर शुक्रवार दि.१ ऑगस्ट रोजी मंजुरी मिळाली. नळदुर्ग शहर भाजप कार्यालयाबाहेर व बसस्थानक समोरील संविधान चौकात फटाके फोडून अणि साखर वाटून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

यावेळी भाजपचे नेते सुशांत भूमकर, माजी प.स. सदस्य साहेबराव घुगे, माजी नगरसेवक निरंजन राठोड, भाजपचे शहर उपाध्यक्ष किशोर नळदुर्गकर , उपाध्यक्ष गणेश मोरडे, भाजयुमोचे जिल्हा सरचिटणीस श्रमिक पोतदार, शशिकांत पुदाले, सचिन घोडके, स्वीय सहाय्यक सुजित जमदाडे, महावितरणचे प्रसन्ना कदम, संदीप गायकवाड, पत्रकार शिवाजी नाईक यांच्यासह कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते. नळदुर्ग महावितरणचे नवीन उपविभागीय कार्यालय निर्मिती लातूर परिमंडळांतर्गत येणाऱ्या धाराशिव मंडळातील तुळजापूर विभागांतर्गत येणाऱ्या तुळजापूर उपविभागाचे विभाजन करून नवनिर्मित नळदुर्ग उपविभागीय कार्यालयाच्या आस्थापनेवर एकूण १२ पदे आहेत, नवनिर्मित नळदुर्ग उपविभागीय कार्यालयाच्या आस्थापनेवरील नव्याने निर्माण करण्यात येणाऱ्या १२ पदासाठी निर्मितीचा खर्च रुपये १,२५,०९,६०४ इतका वार्षिक आर्थिक भार व प्रशासकीय खर्च रुपये १४,८०.०००/- इतका मंजूर केला आहे.

नवनिर्मित नळदुर्ग उपविभागीय कार्यालयाकरिता मंजूर पदे

उपकार्यकारी अभियंता, कनिष्ठ अभियंता, निम्न लिपिक, सहाय्यक लेखापाल, उच्चस्तर लिपिक सहाय्यक अभियंता, मुख्य तंत्रज्ञ, व शिपाई असे मिळून बारा पदे मंजूर करण्यात आले आहे.

# अण्णाभाऊ साठे समाजभूषण पुरस्कार विजेते संजय ठोकळ यांचा वाळूज महानगरात मातंग समाजाच्यावतीने भव्य सत्कार!

वाळूज महानगर / पांडुरंग गायकवाड



आज दिनांक १ ऑगस्ट २०२५ रोजी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त भडकल गेट, छत्रपती संभाजीनगर येथे अभिवादन सभेचे भव्य आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट मंत्री व छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री मा. श्री. संजय पांडुरंग शिरसाठ यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.

या कार्यक्रमात सन २०२५ मधील अण्णाभाऊ साठे समाजभूषण पुरस्कार मुंबई येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ठझख) चे लढवय्या जिल्हाध्यक्ष श्री. संजय रत्नाकर ठोकळ यांना प्रदान करण्यात आला होता. समाजहितासाठी लढणाऱ्या आणि सतत उपेक्षित घटकांच्या न्यायासाठी आवाज उठवणाऱ्या कार्यकर्त्याचा हा पुरस्कार म्हणजे संघर्षशीलतेला दिलेला सन्मानच होय.

याच पार्श्वभूमीवर आज वाळूज महानगरातील मातंग समाजाच्यावतीने श्री. संजय ठोकळ यांचा प्रथितयश व सन्माननीय सत्कार करण्यात आला. पुरस्काराचा स्मृतीचिन्ह असलेली विशेष फोटो फ्रेम, शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

सत्कार सोहळ्यात माननीय पालकमंत्री श्री. संजय शिरसाठ यांच्या हस्ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची प्रतिमा बहाल करण्यात आली, ही बाब विशेष महत्त्वाची ठरली.या कार्यक्रमात पत्रकार पांडुरंग गायकवाड, अमोल भाऊ कसाब, प्रकाशराव काथवटे नितीन गायकवाड, खोतकर भाऊ आणि अनेक सामाजिक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण परिसरात सामाजिक ऐक्य आणि परिवर्तनशील विचारांचा आवाज बुलंद झाल्याचे चित्र होते.

# निफाड तालुक्यात ११७ पैकी ५९ ग्रामपंचायतींमध्ये महिलाराज

निफाड ।रामभाऊ आवारे (दै.महाभारत)

निफाड तालुक्यातील मुदत संपलेल्या ११७ ग्रामपंचायतींमध्ये सन २०२५ ते २०३० या पंचवार्षिक कालावधीसाठी थेट महिला सरपंच पदाच्या आरक्षणाची सोडत आज (३० जुलै) तहसील कार्यालयात काढण्यात आली. यामध्ये ५९ ग्रामपंचायतींमध्ये महिला उमेदवारांना आरक्षण मिळाले असून, आगामी काळात 'लाडकी बहीण' या गावांमध्ये सत्तेवर विराजमान होणार आहे. तहसीलदार मा. विशाल नाईकवाडे यांच्या अध्यक्षतेखाली ही आरक्षण सोडत पार पडली. नागरिकांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या प्रक्रियेमुळे गावपातळीवर राजकीय हालचालींना वेग येण्याची शक्यता आहे.

महिलांना न मिळालेल्या संधींचा विचार

सन २०२० ते २०२५ या कालावधीत ज्या ग्रामपंचायतींमध्ये महिलांना सरपंचपदाचा लाभ मिळाला नव्हता, अशा ३२ पैकी १३ ग्रामपंचायतींमध्ये पुन्हा महिला आरक्षण कायम ठेवण्यात आले आहे. यामध्ये खालील गावांचा समावेश आहे : अनुसूचित जमाती (स्त्री): कानळद, कुंभारी, पंचकेश्वर, पाचोरे खु. नागरिकांचा मागास प्रवर्ग (स्त्री): कुंदेवाडी, सारोळेथडी, तामसवाडी, थेरगाव सर्वसाधारण (स्त्री): नारायण टेंभी, सारोळे खुर्द, वेळापूर, कुरडगाव, हनुमाननगर

नवीन आरक्षणानुसार महिला आरक्षित ग्रामपंचायती: अनुसूचित जाती (स्त्री) – ८ पैकी ४ : दिक्षी, ओणे, रुई (धानोरे), खडकमाळेगाव (खानगाव नजीक) अनुसूचित जमाती (स्त्री) – ८ पैकी ४ : खेडे, नैताळे (रामपूर), दावचवाडी, धारणगाव वीर मागास प्रवर्ग (स्त्री) – २३ पैकी १२ : भुसे, खानगाव थडी, चापडगाव, शिरवाडे वणी, बोकडदरे, चांदोरी (नागापूर), भरवस (मानोरी खुर्द), साकोरे मिग, थेटाळे, चाटोरी, गोंडेगाव, अंतरवेली सर्वसाधारण प्रवर्ग (स्त्री) – ४६ पैकी शिरसगाव, पिंपळगाव नजीक, लासलगाव, महाजनपूर, उगाव, वाहेगाव दहेगाव, गाजरवाडी, दारणा सांगवी, पिंपळगाव निपाणी (सावळी), रौळस, बेहेड, रसलपूर, रामनगर, म्हाळसाकोरे, सायखेडा, करंजी खुर्द (ब्राह्मणवाडे), शिरवाडे वाकद, मुखेड, मांजरगाव, टाकळी विंचूर, ब्राम्हणगाव वनस, सोनेवाडी खुर्द, काथरगाव, तारुखेडले, कोटमगाव, वाकद या २६ ग्रामपंचायतींमध्ये महिलांना सरपंचपदासाठी संधी मिळाल्यामुळे ग्राम राजकारणात महिला नेतृत्वाची संख्या मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता आहे.

# बल्लारपुरात स्मार्ट मीटर लावले तर खबरदार..!

चंद्रपूर (नरेंद्र सोनारकर)



शहर कांग्रेस कमेटी तर्फे बल्लारपूर शहरात स्मार्ट मीटर बसवले जात आहेत, ते तात्काळ थांबवण्याचे निवेदन महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीचे उपकार्यकारी अभियंता अरविंद काटकर यांना देण्यात आले असून शहरात नागरिकांच्या विरोध असतांना स्मार्ट मिटर बसविल्यास तीव्र आंदोलन करण्याच्या इशारा देण्यात आला आहे.

निवदेनात म्हटले आहे की, बल्लारपुर शहरात मागील काही दिवसांपासून जूने विज मिटर काढून नवीन स्मार्ट मिटर लावण्याचे काम सुरु आहे. परंतू ज्यांच्या घरी हे स्मार्ट मिटर लावण्यात आलेले आहे, त्यांच्या तक्रारीनुसार स्मार्ट मिटर लावल्या नंतर त्यांचे विज बिल दुप्पट झालेले आहे. काही तक्रारीनुसार मिटर लावणाऱ्या एजेंसी कडुन विज ग्राहकांवर दडपण आणून स्मार्ट मिटर लावण्यात येत असल्याचेही निवेदनात म्हंटले आहे.

बल्लारपुर शहरात स्मार्ट विज मिटर लावण्याचे काम तत्काल थांबावे. तसेच ज्यां विज ग्राहकांच्या घरी , दुकानात नवीन स्मार्ट मीटर लावन्यात आलेले आहे त्याना काडुन जूने विज मीटर लावन्यात यावे.अशी विनंतीही निवेदनातून करण्यात आली आहे.निवेदन देताना महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे सचिव घनश्याम मूलचंदानी, शहराध्यक्ष देवेंद्र आर्य, माजी शहराध्यक्ष अब्दुल करीम शेख, भास्कर माकोडे, डॉ. सुनील कुलदीवार, नरेश मूंधड़ा, सुनंदा आत्राम, नरसिंग रेब्बावार, प्रणेश अमराज, मेहमूद पठाण, कासिम शेख, मंगेश बावणे, नरेश आनंद, नरेश बुरांडे यांच्यासह कॉंग्रेस, महिला कॉंग्रेस, युवक कॉंग्रेस, एनएसयूएआय आणि इंटकचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर काळजीपूर्वक करावा- सहाय्यक पोलिस निरीक्षक धरमसिंग सुंदर्डे

शेवगाव । एम.के.लाकडे (दै.महाभारत)

आपल्या दैनंदिन वापरातील गोष्टींमध्ये आता मोबाईलचा समावेश झाला आहे.एवढंच काय तर अनेकांच्या जीवनातील सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे मोबाईल बनली आहे.त्याचं महत्त्वाचं कारण म्हणजे हे मोबाईल त्यातील ॲपच्या माध्यमातून आता आर्थिक व्यवहाराचं प्रमुख साधन बनले आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपला मोबाईल काळजीपूर्वक वापरावा असे प्रतिपादन सहायक पोलिस निरीक्षक मा.धरमसिंग सुंदर्डे यांनी केले ते रेसिडेन्शिअल हायस्कूल याठिकाणी महाराष्ट्र पोलिस मार्गदर्शन अभियानाअंतर्गत व्याख्यानामध्ये बोलत होते.ते पुढे म्हणाले की, ऑनलाईन आर्थिक व्यवहार जसे वापरणाऱ्यांसाठी सहज सोपे आणि फायद्याचे ठरत आहेत, तसेच ते सायबर क्राईमच्या माध्यमातून ऑनलाईन गैरव्यवहार किंवा फसवणूक करणाऱ्यांसाठी संधीही ठरत आहेत.अशाच ऑनलाईन व्यवहारांसाठी वापरल्या जाणाऱ्या बँकिंग सुविधा, वेगवेगळे ॲप किंवा अनेकदा इतर गोष्टींचा वापर




करूनही सायबर गुन्हेगार आर्थिक फसवणूक करताना दिसतात.गेल्या काही दिवसांत अशाच आणखी एका फसवणुकीची चर्चा पाहायला मिळाली. ऑनलाईन ट्रेडिंग स्कॅमच्या माध्यमातून काही जणांनी फसवणूक झाल्याच्या बातम्या समोर येत आहेत.

या मार्गदर्शन प्रसंगी विद्यालयामध्ये लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंती तसेच अहमदनगर जिल्हा मराठा संस्थेचे माजी उपाध्यक्ष मान. रामनाथजी वाघ साहेब यांच्या जयंती निमित्त अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर श्री कृष्णा मोरे साहेब महाराष्ट्र पोलिस,मा.श्री. विकास ढाकणे (होमगार्ड),मा.श्री. शेख शाहरुख (होमगार्ड) तसेच विद्यालयाचे प्राचार्य बालाजी गायकवाड उपप्राचार्य कचरू शिंदे, पर्यवेक्षक विलास फटांगरे तसेच आदी उपस्थित होते.या कार्यक्रमासाठी विद्यालयातील सर्व विद्यार्थी तसेच सर्व शिक्षक बंधू- भगिनी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रामनाथ काळे यांनी केले तर आभार बाळासाहेब गव्हाळ

